# क्षण अभिमानाचा... महिला सन्मानाचा...





◆ सामाजिक कार्यात भरीव योगदान देणाऱ्या स्त्री कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांची विशेष दखल घेऊन ८ मार्च – जागतिक महिला दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ पुणे युनिर्व्हसिटीने बचत गटाच्या संघटिका **सौ. वनिता जगताप** व रुग्ण सहाय्यक वर्ग, मालेच्या शिक्षिका **सौ. दुर्गा केणी** यांना रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ च्या डिस्ट्रिक्ट फर्स्ट लेडी डॉ. हेमाजी परमार यांच्या हस्ते **उल्लेखनीय सेवा पुरस्कार** देऊन सन्मानित करण्यात आले.

◆ मध्यवर्ती ज्येष्ठ नागरिक संघटना व आनंदी ज्येष्ठ नागरिक संघ संयुक्त सहकार्याने चऱ्होली प्रकल्पाच्या कार्यकर्त्या **सौ. चारुता कडुरकर** यांच्या वृद्ध सेवा कामाचे कौतुक महिला दिनानिमित्त सौ. मेधाताई कुलकर्णी यांच्या हस्ते पुरस्कार देऊन करण्यात आले.

**या सर्व महिला कार्यकर्त्यांचे अभिनंदन!**

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

२३ मार्च शहीद दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून
प्रा. डॉ. श्री. गणेश राऊत (लेखक, प्राध्यापक) आणि श्री. सागर मुळीक (राज्यसेवा २०२१ – ८९ वी रँक) उपस्थित होते. मार्गदर्शन करताना शहीद झालेल्यांचे बलिदान स्मरत संयुक्त पूर्व परीक्षा तयारी, वेळेचे नियोजन, परीक्षेला सामोरे जाताना अशा अनेक महत्त्वाच्या विषयांवर त्यांनी प्रेरणादायी संवाद साधला.

# समुपदेशन विभाग



दि. ८ मार्चला सेनापती बापट माध्यमिक विद्यालय, माले या शाळेत इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी 'ओळख स्पर्शाची' या विषयावर तर दि. १४ मार्चला 'करीयरची वाट निवडताना' या विषयावर सौ. मेघाताई नगरे यांनी सत्र घेतले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या मनात विषयाचे नाव ऐकताच अनेक प्रश्न निर्माण झाले. सत्रात रंगत भरत, मुलांना बोलतं करत ताईंनी मुलांच्या मनातील सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली.

दि. १४ मार्चला याच शाळेतील इयत्ता आठवीच्या वर्गावर 'दिनचर्या' हा विषय मांडताना मेघाताईंनी आपली दिनचर्या कशी असावी, दिवसाचे वेळापत्रक, चांगल्या सवयी, दररोजच्या व्यायामाचे महत्त्व अशा अनेक महत्त्वाच्या विषयांवर मुलांशी संवाद साधला.

वर्धिनीच्या सर्व विभागातील कार्यकर्त्यांसाठी 'समन्वय' या विषयावरील सत्र श्री. शिरीष पटवर्धन यांनी घेतले. सत्रात खालील मुद्दे मांडण्यात आले –

◆ छोट्याशा एकत्रीकरणातून एकमेकांचे विचार कळतात.

◆ काम करणारी प्रत्येक व्यक्ती महत्त्वाची असते. सगळ्यांनी मिळून केलेले काम मांडले जाते तेव्हा त्या कामाची भव्यता दिसते.

◆ काम करताना सहजता असली पाहिजे.

◆ प्रत्येकाने स्वतःच्या कामाइतकेच महत्त्व इतरांच्या कामाला सुद्धा दिले पाहिजे.

◆ आपला विभाग सोडून इतर विभागातील कार्यकर्त्यांशी संवाद वाढवला पाहिजे, एकमेकांना मदत केली पाहिजे.

◆ काम करताना एकमेकांवरचा विश्वास हा खूप महत्त्वाचा आहे. सहजतेने समन्वयता साधता येते.



# उत्थान विभाग



दि. ८ मार्चला महिला दिनानिमित्त प्रियदर्शनी अभ्यासिकेत मुलांनी क्राफ्ट पेपर पासून शुभेच्छा कार्ड तयार करून आपल्या आईला महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त विभागातील तीनही भागात दि. १२ ते दि. १८ मार्च या कालावधीत शिवसप्ताह साजरा झाला. त्यामध्ये मुलांच्या चित्रकला, बोधकथा, निबंध या स्पर्धा व शिवचरित्र वाचन, शिवरायांच्या जीवनावर आधारित प्रश्नमंजुषा घेण्यात आली.

◆ मार्गदर्शन / समुपदेशन केंद्र : दि. ८ मार्च महिला दिनानिमित्त महात्मा फुले भागातील अभ्यासिकांसाठी पालक सभा घेण्यात आली. या पालक सभेला उत्तम प्रतिसाद मिळाला. मुलांना चांगल्या सवयी लावण्यासाठी कोणत्या गोष्टी कराव्यात तसेच मोबाईलचा योग्य वापर याविषयी हेमांगी ताईंनी पालकांशी संवाद साधला.





# नवा संकल्प, नव्या संस्कार वर्गाची सुरुवात

नवीन वर्षाचे संकल्प, विभाग समितीच्या सहमतीने ठरविल्यानंतर कामाचा विस्तार गुणवत्तापूर्वक व्हावा म्हणून भवानी पेठ येथे भवानीमाता मंदीरात नवीन संस्कार वर्ग सुरु करण्यात आला. याच भागातील नवीन कार्यकर्ता जोडला गेला. मुलांच्या आवडीचे खेळ, कृती उपक्रम, अभ्यास अशा सर्वांची सांगड घालत हा वर्ग स्थिर करण्यात विभाग नक्कीच यशस्वी ठरेल.

# युवा विभाग : हरिश्चंद्रगड सहल



दि. ३१ मार्च ते दि. २ एप्रिल या कालावधीत श्री. सतीश बिराजदार यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या सहलीची सुरुवात ज्ञापुंच्या स्मृतीस अभिवादन करून व त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. श्री. निलेश धायरकर यांनी हरिश्चंद्र गड सहल का आणि कशासाठी याविषयी संवाद साधला. श्रीमती पुष्पाताईंनी काही आठवणी सांगत सर्व युवांना सहलीसाठी शुभेच्छा दिल्या. शुक्रवारी किल्ला सर करून कार्यकर्ते शनिवारी पहाटे उपासना आणि प्रबोधनासाठी तयार झाले. घोषणांच्या आवाजांनी दंडगोल, ध्वजयुद्ध अशा मर्दानी खेळांनी गड दुमदुमून गेला. सहल पालक श्री. विलास कुलकर्णी यांनी गणेश गुहा येथे 'आपले जीवित ध्येय' या विषयावर तर कोकण कड्यावर श्री. जितेंद्र कोठारी यांनी 'आठवणी ज्ञापुंच्या' या विषयावर संवाद साधून युवकांना प्रेरणा दिली. रात्र कार्यक्रमात पद्य मंजुषा घेण्यात आली. पसायदानाने या दिवसाचा समारोप झाला. दुसऱ्या दिवशी सर्वजण सहा वाजता तारामती शिखरावरती पोहोचले. उपासनेनंतर सूर्योदयाच्या रम्य आणि शांत वातावरणात विलास सरांनी वर्धिनीच्या प्रार्थनेचा अर्थ मुलांना सांगत रोजच्या जगण्यात प्रार्थना कशी आचरावी हे पटवून दिले. आठवणी आणि प्रेरणा घेऊन परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली.



## अभिनंदन

कलानगरी कोल्हापूर मराठी फिल्म फेस्टिव्हलमध्ये

- सर्वोत्कृष्ट साहस दृश्य - चित्रपट - विसर्जन
- सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेता - चित्रपट - ईमेल फिमेल
- सर्वोत्कृष्ट नृत्य दिग्दर्शन - चित्रपट - ईमेल फिमेल

असे पुरस्कार
स्वामी विवेकानंद शाखेतील युवक
**श्री. योगेश जाधव**
यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटांना मिळाले.

## नेतृत्व शाखा आयोजित मुलाखत

विकसित व्हावे, अर्पित होऊनी जावे । या वर्धिनीच्या ध्येयपंक्तीप्रमाणे स्वतःला विकसित करण्यासाठी कसे प्रयत्न करायचे याचा वस्तुपाठ असणारे श्री. अजय नाईक यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम युवक शाखेच्या निमित्ताने दि. १८ मार्चला आयोजित करण्यात आला. गुरुवार पेठेत एका चाळीत राहणारा सामान्य मुलगा इथपासून सुरू झालेला प्रवास आज SKF Factories चे युरोपचे प्रमुख इथपर्यंत येऊन पोहोचला आहे. या प्रवासात आलेल्या असंख्य अडचणी आणि त्यावर अजय नाईक यांनी केलेली यशस्वी मात सर्व उपस्थित युवकांना प्रेरणा देणारी ठरली.

## लातूर अभ्यास दौरा

शाखा, युवा, उत्थान विभागाच्या कार्यालयीन कार्यकर्त्यांचा अभ्यास दौरा दि. १४ ते १६ फेब्रुवारी या कालावधीत झाला. लातूरमधील जन-आधार सेवाभावी संस्थेच्या कामाची ओळख कार्यकर्त्यांनी करून घेतली. संस्थेचे अध्यक्ष श्री. संजय कांबळे यांनी 'कचरा व्यवस्थापन' या विषयात भरीव काम केले आहे. चिंतनशील, कृतीशील, विचारवंत, पद्मभूषण, ध्येयतपस्वी डॉ. अशोक कुकडे यांच्याशी झालेल्या संवादातून विवेकानंद हॉस्पिटलच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या झालेल्या विस्ताराची माहिती कार्यकर्त्यांना मिळाली. भटक्या विमुक्तांसाठी पालावरची शाळा, रोजगार अशा विषयांवर अनेक वर्षे झोकून काम करणारे श्री. नरसिंग झरे यांची भेट व त्यांचे अनुभव कथन कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे ठरले.







## श्रद्धांजली

- संस्थेच्या हितचिंतक, देणगीदार, उत्तम वक्त्या **सौ. संध्याताई साबणे** यांचे आजारपणामुळे दुःखद निधन झाले.
- 'स्व'-रूपवर्धिनीचे उपाध्यक्ष श्री. उदयभाई गुजर यांचे लहान बंधू, विंग गावातील ज्येष्ठ उद्योजक **श्री. संदेशभाई भानुदास मेहता (गुजर)** यांना देवाज्ञा झाली.

**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**
**वर्धिनीचा परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.**